# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१/२०२४** **दिनांक ०३/०१/२०२४**
**स्थळ- मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ३.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.०३.०१.२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. जिल्हा न्यायालय अहमदनगर येथील मिनी कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३४७३/२०२४, दि.०१.०१.२०२४ अन्वये सर्व मा. सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा **बुधवार दि. ०३.०१.२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर** येथे मिनी कॉन्फरन्स हॉलमध्ये मा. श्री. सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. तुकाराम हुलवळे,**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

विषय नं.१ दि.२१.११.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.१ दि. २१.११.२०२३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

---

विषय नं.२ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.

१. www.sai.org.in व online.sai.org.in या बेवसाईडचे होस्टींगसाठी क्लाऊड सर्व्हर उपलब्ध करणेकामी राबविणेत येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत पात्र निम्नतम दरधारक निविदाकार M/s. Hostin Services Pvt. Ltd. Pune यांना कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही--माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

२. सन २०२४ चे साईलीला अंक (मराठी व हिंदी-इंग्रजी) (द्वै-मासिके) व वितरणासाठी पाकीटे छपाईकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेसमोर चक्रिय पद्धतीने सादर करणेबाबत.

निर्णय क्र.२/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- प्रकाशने विभाग)

---

३. संस्थानचे विविध इमारतीवरील टेरेसवर रुफ टॉप सोलर पी. व्ही. सिस्टीम उभारणीकामी संस्थानमार्फत नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागार यांनी तयार केलेल्या DPR चे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे समोर ऑनलाईन केलेल्या सादरीकरणाचे अनुषंगाने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी सादरीकरणा अंती दिलेल्या सुचना-वजा निर्देशानुसार तांत्रिक सल्लागार यांनी प्रस्तावित केलेल्या DPR नुसार संस्थान नियुक्त तांत्रिक सल्लागार यांचेशी चर्चा करून प्रस्तावित रुफ टॉप सोलर पी. व्ही. सिस्टीम प्रकल्पाकरिता येणा-या खर्चास तसेच सदरकामी संस्थानचे विहित पद्धतीने पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

४. श्री साईबाबा संस्थानचे सर्व (१०२ नग) एअर सर्कीट ब्रेकरचे कॉप्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट एक वर्षाच्या कालावधीकरीता देणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदां मधील (Tender ID 2023_ SAI_961101_1) निम्नतम दरधारक मे. टेक इंडिया इंजिनिअर्स पा. लि., मुंबई यांचेशी चर्चा / वाटाघाटी होऊन त्यांना चक्रीय पद्धतीने कार्यादेश देणेबाबत.

निर्णय क्र.२/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभाग)

---

५. संस्थानचे आरोग्य विभागासाठी स्विपर मशिन स्टॅण्डबाय बॅटरीसह खरेदीकामी GeM निविदेत प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

निर्णय क्र.२/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

६. सन २०२३-२४ करिता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे व इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर (ब्लॅकेट) धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी केलेल्या ई–निविदा प्रक्रिया रद्द करुन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.

निर्णय क्र.२/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)

---

७. श्रीराम जन्मभुमि तीर्थक्षेत्र न्यास, अयोध्या येथून आलेल्या मंगल अक्षता कलश पूजन व सदरहू कलश दि. १७.१२.२०२३ ते दि. ३१.१२.२०२३ पर्यंत श्रींचे मंदिरामध्ये दर्शनासाठी ठेवणेबाबत.

निर्णय क्र.२/७ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

८. शिर्डी महोत्सव – २०२३ साजरा करणेकामी सांस्कृतिक कार्यक्रम निश्चित करणेबाबत.

निर्णय क्र.२/८ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

९. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील रिट पिटीशन क्र. ६८८४/२०१९ बाबत.

**निर्णय क्र.२/९** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

१०. सन २०२४-२५ करिता अकुशल, कुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करण्यासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२/१०** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-कामगार विभाग)

---

११. सन २०२३-२४ करीता कंत्राटी सुरक्षा व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी नविन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करण्यासाठी दाखल करण्यात आलेले सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ३६८१/२०२३ मधील मा. न्यायालयाच्या दि.११.०८.२०२३ रोजीचे आदेशाप्रमाणे सध्याचे सिक्युरिटी कंत्राटदारांना ३१.१२.२०२३ पासून पुढे तीन महिने अथवा जनहित याचिका क्रमांक १५/२०२३ मध्ये मा. न्यायालयाचे आदेश होईपावेतो सध्याचे कंत्राटदार यांना सध्या चालू आहे त्या दरात मुदतवाढ देणेबाबत.

**निर्णय क्र.२/११** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-कामगार विभाग)

---

१२. मंदीर विभागाकडील अनोंदीत सोने /चांदी–श्रींचे समाधीचे सोन्याचे ०६ नग कोपरे व श्रीद्वारकामाईतील जुने व नवीन चांदीचे मखरांची सोने -चांदी स्टॉक नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.२/१२** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही- मंदिर विभाग)

---

१३. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Medical Oxyen, Nitrous Oxide, Carbon dioxide Gas खरेदी करणेकामी फेर ई-निविदा मागविणेबाबत.

**निर्णय क्र.२/१३** चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पीटल)

---

विषय नं.३ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सेवाप्रवेश नियम-२०२४ बाबत.

निर्णय क्र.३ प्रदीर्घ चर्चा झाली. आलेल्या हरकतीच्या निराकरणाचे अवलोकन केले. समक्ष सुचविण्यात आल्याप्रमाणे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दुरुस्त्या करुन सुधारित सेवाप्रवेश नियम-२०२४ ची एक प्रत (परिशिष्टांसह) मा.अध्यक्ष महोदय व सदस्य यांचेकडे पाठवून शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावी.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.४ सन २०२४ मध्ये संस्थानमार्फत साजरे करण्यात येणा-या तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका छपाई करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.४ वेळेअभावी तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.५ संस्थान कायम कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०२३-२४ वर्षाचा शैक्षणिक शुल्क परतावा अदा करणेबाबत..

निर्णय क्र.५ वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.६ शैक्षणिक संकुल प्रकल्पाकरीता इंटेरीअर वर्क, खेळाची मैदाने विकसीत करणे, ऑडीटोरीयम करीता एच.व्ही.ए.सी. करणे व अनुषंगीक सिव्हील व इलेक्ट्रीकलची कामे करणेसाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारक यांना कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.६ निम्नतम निविदाधारक यांचेशी वाटाघाटी केली. त्यांनी रु.४५.५० कोटी मध्ये सदरचे काम करण्यास तयारी दर्शविली. यापुर्वी एकुण कामासाठी समितीने मंजुर केलेल्या रकमेपेक्षा एकुण तीनही निविदा मिळून होणारा खर्च यापुर्वी मा.उच्च न्यायालयाने मंजुर केलेल्या रकमेपेक्षा अधिक होत असल्याने नव्याने सी ए दाखल करुन मा.उच्च न्यायालयाकडून परवानगी घेण्याचे अटीवर मान्यता दिली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.७ मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं. १८३ मध्ये उभारलेल्या शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतींकरिता डिजीटल स्मार्ट बोर्ड खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारक यांना कार्यादेश देणेविषयी निर्णय होणेबाबत.

**निर्णय क्र.७** यापुर्वी एकुण कामासाठी समितीने मंजुर केलेल्या रकमेपेक्षा एकुण तीनही निविदा मिळून होणारा खर्च यापुर्वी मा.उच्च न्यायालयाने मंजुर केलेल्या रकमेपेक्षा अधिक होत असल्याने नव्याने सी ए दाखल करुन मा.उच्च न्यायालयाकडून परवानगी घेण्याचे अटीवर मान्यता दिली. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.८** संस्थानमार्फत श्री रामनवमी उत्सव-२०२४ तसेच उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी अंदाजे रक्कम रु. ४२,७४,०००/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास व याकामी ई -निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.८** वेळेअभावी तहकुब.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.९** संस्थानचे द्वारावती भक्तनिवास व साईबाबा भक्त निवासस्थान (५०० रुम) या इमारतींचे सांडपाणी शुद्धीकरण करून पुर्नवापर करणेसाठी अनुक्रमे 200 KLD व 300 KLD क्षमतेची संयत्रे ( Sewage Treatment Plant) BARC यांनी विकसीत केलेल्या Hybrid Granular SBR Treatment (GST) या तंत्रज्ञानानुसार उभारणीकरीता येणारे एकुण रु.२०५.३२ लक्ष मात्रचे प्राथमिक ढोबळ अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता मिळणेसतसेच सदर प्रकल्पाचे उभारणीकरीता BARC यांचे परवानाधारक (Licensees) व्यक्ती/संस्था यांचेकडून Design Build Operate Transfer (DBOT) या तत्वावर ई-निविदा मागविणेकरिता मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.९** वेळेअभावी तहकुब.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

---

**विषय नं.१०** संभाव्य पाणीटंचाई कालावधीत संस्थानमार्फत करावयाच्या उपाययोजनांना व त्याकरीता येणारे अपेक्षित अंदाजे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१०** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभाग)

---

**विषय नं.११** मे. स्प्रिती प्रॉडक्ट प्रा. लि. अंबाला यांना माहे जानेवारी २०२४ ते मार्च २०२४ या कालावधीसाठी गाईचे शुद्ध तुप पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.११** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.१२** संस्थानचे विविध विभागांसाठी संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेबाबत.

**निर्णय क्र.१२** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.१३** संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी पेपरकप खरेदीकामी GeM निविदा प्राप्त न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत..

**निर्णय क्र.१३** वेळेअभावी तहकुब.

(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

**विषय नं.१४** साठा संपुष्टात येत असलेल्या संस्थान प्रकाशित श्री सद्गुरु साईनाथ सगुणोपासना आरतीचे विविध प्रादेशिक भाषेतील पुस्तके साईभक्तांना उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१४** वेळेअभावी तहकुब.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१५** संस्थानला आयकर विभागाच्या साधारणत: रु.२४१ कोटी करभरणा नोटीसी संदर्भात आयकर अपील न्यायाधिकरणाच्या (Income Tax Appellate Tribunal) करमाफी आदेशाची नोंद घेणेबाबत.

**निर्णय क्र.१५** वेळेअभावी तहकुब.

(कार्यवाही- लेखा शाखा विभाग)

---

**विषय नं.१६** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून जिल्हा परिषद अहमदनगर यांना शाळांच्या नवीन वर्ग खोल्या बांधकामासाठी दुस-या व तिस-या टप्प्यांतील अर्थसहाय्य देणेबाबत.

**निर्णय क्र.१६** वेळेअभावी तहकुब.

(कार्यवाही-लेखा शाखा विभाग)

---

**विषय नं.१७** नवीन श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीमध्ये साईभक्तांचे सुविधेकरीता अतिरिक्त व्यवस्था निर्माण करणेसाठी येणारे रक्कम रु.३९,९०,०००/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१७** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.१८** मंदिर परिसरातील इमारतीचे स्लोपींग स्लॅबचे खराब झालेल्या डिझाईन पट्टया बदलणेबाबत.

**निर्णय क्र.१८** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**विषय नं.१९** संस्थान कर्मचारी यांचेकरिता साईनिवास व सुलभ शौचालयाचे मधील व पाठीमागील जागेत टु व्हीलर पार्कींग व्यवस्था करणे व पूर्व बाजुकडील हद्दीवरील कम्पाऊंड भिंतीचे बांधकाम करणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.१९** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२०** श्री साईबाबा संस्थान मार्फत नव्याने लेजर शो (Light & Sound Show)प्रकल्प BOT (Build–Operate-Transfer) तत्वावर उभारणेसाठी सल्लागार Rhino Engineers Pvt.Ltd., Ahmadabad व श्री नितीन कुलकर्णी यांचे सादरीकरण पाहून सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.

**निर्णय क्र.२०** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२१** मौजे निघोज येथील साईपालखी निवारामधील संस्थानला देणगी मिळालेल्या इमारतीकरिता जनरेटर रुमचे बांधकाम करणे, कॉमपैक्ट सबस्टेशनकरिता फाऊंडेशन तयार करणे व केबल करिता नाली तयार करणे याकामासाठी येणा-या रक्कम रु. २८,६९,४६६/-मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२१** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२२** श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीकरीता आकर्षक नव्या तंत्रज्ञानाची विद्युत रोषणाई करणे, होलोग्राफीक इमेज, एलईडी प्रोजेक्शन व श्री साईबाबांचे जीवन चरीत्रावरील थीम तयार करणेसाठी सल्लागार Rhino Engineers Pvt., Ltd., Ahmadbad यांनी तयार केलेले सादरीकरण होणेबाबत.

**निर्णय क्र.२२** वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

**विषय नं.२३** अर्जित रजा साठविणे व रजेचे रोखीकरण करणेबाबत.

**निर्णय क्र.२३ वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४ दि.३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या/होणा-या कर्मचा-यांना लगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्ती वेतन निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४ वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२५ संस्थान कायम व संस्थान कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२५ वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२६ नविन अद्यायावत सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी तयार केलेल्या प्रकल्प अहवालाचे सादरीकरण व याकामी येणा-या एकत्रित खर्चास (रु.३५.४०कोटी+कर) मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६ वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२७ इयत्ता ११ वी व १२ वी दोन उर्दु कॉलेज वर्ग चालू करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७ वेळेअभावी तहकुब.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.२८ श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुलै-२०२२ ते सप्टेंबर-२०२२ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१,७५,३२,९२८/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८ वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पीटल)**

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये ऑक्टोंबर-२०२२ ते मार्च-२०२३ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.३,१०,८५,१९६/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९ वेळेअभावी तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पीटल)**

---

**विषय नं.३०** **श्री साईबाबा धर्मादाय हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल-२०२३ ते ऑगस्ट-२०२३ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.२,८०,५०,६७७/- नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०** **वेळेअभावी तहकुब.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पीटल)**

---

**विषय नं.३१** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील तरतुदीन्वये सल्लागार परिषद गठीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१** **वेळेअभावी तहकुब.**

**(कार्यवाही- सभा कामकाज विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.१ ते ३१ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर रात्रौ. ०८.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(तुकाराम हुलवळे)**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य सचिव, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**